नियमित दिवाणी दावा कमांक 129/2014
(CNR NO. MHNS13-001226-2014)

नियमित दिवाणी दावा कमांक 129/2014
मधील निशाणी कमांक 25 वरील आदेश
कृपालदास महाराज विरुध्द बाळकृष्ण पवार आणि इतर

अर्ज, शपथपत्र आणि वादीचा जबाब वाचला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले. दोन्ही वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

2. प्रस्तुतचा दावा हा निरंतरच्या ताकिदीसाठी दाखल केला आहे. सामनेवालाचे म्हणणे असे की, दावा मिळकतीचा सर्व्हे नंबर 653 क्षेत्र 12 एकर 7 गुंठे होते. मिळकतीचे मूळ मालक श्री. पांडूरंग रामचंद्र कुलकर्णी यांनी ती मिळकत सामनेवालाचे आजोबा महादू सदू पगार आणि नामदेव केदू शेजवळ यांना एकत्रित खरेदीखताव्दारे विकी केली. खरेदीखताव्दारे त्यांची नावे 7/12 उता—यावर नोंद झाली. त्यानंतर त्या मिळकतीतून मुंबई—आग्रा महामार्ग गेला. त्यासाठी काही जमिन संपादित झाल्याने ते क्षेत्र रस्त्याखाली गेले. मूळ जमिनीचे महामार्गामुळे दोन भाग झाले. त्यापैकी एक भाग हा सामनेवालाचे आजोबा महादू सदू पगार यांच्या नावे झाला तर, महामार्गाच्या पलीकडील दुसरा भाग हा शेजवळ यांना देण्यात आला. महादू सदू पगार हे दिनांक 07/11/1979 रोजी मयत झाले. त्यामुळे त्यांचे वारस म्हणून मुलगा लक्ष्मण महादू पगार, पत्नी राहीबाई आणि मुलगी विठाबाई गोडसे यांची नावे लागली. पुढे राहीबाई आणि विठाबाई यांनी लक्ष्मण महादू यांच्या नावे त्या मिळकतीतील हक्क सोडून दिला. लक्ष्मण महादू पगार हे 30/10/2000 रोजी मयत झाले. त्यामुळे त्या मिळकतीवर लक्ष्मणची मुले म्हणजे या दाव्यातील प्रतिवादी यांची नावे लागली. दरम्यानचे काळात गट स्कीम योजना

आल्याने त्या मिळकतीचा गट क्रमांक 2409 झाला. ती मिळकत प्रतिवादींची वडीलोपार्जित मिळकत असून त्यांचेच कब्जे वहिवाटीत आहे. त्या मिळकतीशी वादीचा कोणताही हक्क व हितसंबंध नाही.

3. सामनेवाला यांचा गणपतीवर विश्वास आणि श्रध्दा असल्याने त्यांनी स्वतः पूजा करण्यासाठी त्या मिळकतीत गणेश मंदीर बांधले. त्या मिळकतीचा सार्वजनिक वापर व्हावा असे सामनेवाला यांचे म्हणणे नव्हते. शिवाय ती मिळकत मुंबई–आग्रा महामार्गालगत असल्याने तिची बाजारभावाप्रमाणे खूप किंमत आहे. त्यामुळे, ती मिळकत फुकटात मिळावी या हेतूने वादी त्या मंदीरावर हक्क दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल झाला आहे.

4. निशाणी क्रमांक 42 प्रमाणे जबाब देवून वादीने सामनेवालाचे म्हणणे नाकारले. वादीच्या म्हणण्याप्रमाणे त्या मंदीराशी तसेच सभोवतालच्या परिसराशी प्रतिवादींचा काहीएक संबंध नाही. त्या मंदीराची पूर्वीपासून महंत श्री. स्वरुपदास महाराज हे देखभाल करीत होते आणि त्या नंतर वादी कृपालदास महाराज सेवा करतात. प्रस्तुतच्या अर्जास कोणतेही कारण घडले नसून तो रद्द करण्याची विनंती केली.

5. अर्ज, वादी यांनी सादर केलेले लेखी म्हणणे तसेच, प्रस्तुत प्रकरणात सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| अनु.क. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1) | अर्जदार/प्रतवादी यांनी प्रथम दर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | होय. |
| 2) | अर्जदारांच्या बाजूने न्यायाचा तराजू आहे काय ? | होय. |
| 3) | तुर्तातूर्त मनाईचा आदेश न दिल्यास अर्जदार यांचे नुकसान होणार आहे काय ? | होय. |
| 4) | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा कमांक 1 ते 3 बाबत** :–

6. सदरचे तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच सोईसाठी तिन्ही मुद्दे मी एकत्रितपणे चर्चेसाठी घेतले आहेत.

7. वादीच्या म्हणण्याप्रमाणे जमिन गट नंबर 2409 मध्ये प्राचीन गणेश मंदीर असून, तिथे महंत श्री रामस्वरुप महाराज हे मनोभावे निस्वार्थ हेतूने गेली अनेक वर्षे सेवा करीत आहे. सामनेवाले हे ते गणेश मंदीर नष्ट करण्याच्या विचारात आहे. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे तो स्वतः त्या मंदीराची देखभाल करीत असून तो विनामोबदला मंदीर परिसरात स्वच्छता करतो.

8. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादातील गणेश मंदीर हे प्राचीन काळापासून अस्तित्वात असून तिथे तो निःस्वार्थपणे गणेश भक्तांची सेवा करतो आणि मंदीराची देखभाल करतो. त्याउलट सामनेवाला यांनी प्रतिदावा दाखल करुन असे सांगितले की, ज्या मिळकतीवर वादातील गणेश मंदीर आहे, ती मिळकत सामनेवाला यांची वडीलोपार्जित मिळकत असून, त्यांचे आजोबांनी ती खरेदीखताव्दारे विकत घेतली होती. त्यांचे आजोबांच्या मृत्यूनंतर ती मिळकत सामनेवाला यांच्या वडीलांच्या नावे आली. त्यांचे मृत्यूनंतर सामनेवाला हे त्या मिळकतीचे मालक झाले.

9. अभिलेखावर दाखल असलेल्या 7/12 उतारे तसेच फेरफार नोंदीवरुन सामनेवाला याच्या म्हणण्याला पुष्टी मिळते. त्याउलट, ते गणेश मंदीर प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. प्राचीन काळापासून मंदीर अस्तित्वात असते तर त्याची निश्चितच शासकिय अभिलेखामध्ये नोंद झाली असती.

10. वादीच्या म्हणण्याप्रमाणे तो स्वतः त्या मंदीराची देखभाल करीत असून दर्शनासाठी मंदीरात येणा—या गणेश भक्तांची निःस्वार्थपणे सेवा करतो. त्या मंदीरावरील ताबा दाखविण्यासाठी वादीने वीजबिल, पोलीस अधिक्षक यांना दिलेला अर्ज, वर्तमानपत्रात छापून आलेल्या बातम्या आणि कार्यक्रम पत्रिका यांचा आधार घेतला. त्या दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, त्या मंदीरात महंत श्री. रामस्वरुप महाराज पूजा—अर्चा करतात. अभिलेखावर दाखल असलेल्या विद्युत बिलाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की ते स्वामीस्वरुप गणेश मंदीर यांच्या नावे आहे. वादीचे

नाव हे कृपालदास महाराज आहे. कृपालदास महाराज या नावाने त्या मंदीराशी संबंधित कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे, त्या मंदिरात वादी हा महंत म्हणून वास्तव्य करतो, हे वादीचे कथन ग्राहय धरता येणार नाही.

11. सामनेवाला यांच्या म्हणण्याप्रमाणे ज्या मिळकतीवर वादातील मंदीर आहे. ती, त्यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. ती सामनेवाला यांची वडीलोपार्जित मिळकत आहे, असे दाखविण्यासाठी सामनेवाला याने 7/12 उतारे आणि फेरफार नोंदीचा आधार घेतला. त्यांचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, ती मिळकत सामनेवाला यांच्या आजोबांनी नोंदणीकृत खरेदीखताव्दारे विकत घेतली होती. पुढे, त्यांचे मृत्यूनंतर ती मिळकत त्यांच्या मुलाच्या नावे झाली. त्याचे मृत्यूनंतर ती मिळकत सामनेवालाच्या नावे झाली. तेव्हापासून सामनेवाला हे त्या मिळकतीचे मालक झाले आहेत. दावा मिळकतीच्या 7/12 उता–यात ताब्याचे रकान्यात सुध्दा सामनेवाला यांची नावे आहेत. अशा परिस्थितीत, ती मिळकत सामनेवाला यांच्या ताब्यात आहे, असा एकमेव निष्कर्ष निघतो.

12. दावा मिळकत ही सामनेवाला यांच्या ताब्यात असल्याने अर्ज नामंजूर झाल्यास निश्चितच वादीचे नाही तर, सामनेवाला यांचे नुकसान होणार आहे. म्हणून, वर नमूद सर्व चर्चा लक्षात घेता, मुद्दा क्रमांक 1 ते 3 चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**नियमित दिवाणी दावा कमांक 129/2014**
**(CNR NO. MHNS13-001226-2014)**

**मुद्दा कमांक 4 बाबत :–**

13. मी, मुद्दा कमांक 1 ते 3 चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविले आहेत. सबब, मी मुद्दा कमांक 4 च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

1. अर्ज निशाणी कमांक 25 मंजूर करण्यात येतो.
2. वादीला असे आदेशित करण्यात येते की, दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो त्याने दावा मिळकत जमिन गट कमांक 2409 मध्ये असलेल्या गणपती मंदीरात बेकायदेशीरपणे प्रवेश करुन सामनेवाला यांच्या कब्जेवहिवाटीस हिल्ला हरकत करु नये.

सही/–
(विजय सी. गवई)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पिंपळगांव बसवंत, ता. निफाड

दिनांक – 17/07/2018